■ २२ कॅरेट सोने दर : ९३,१००/- ■ चांदी दर : १,१४,०००/-

शब्दांना सत्याची धार

प्रहार

सिंधुदुर्ग ● रविवार ३ ऑगस्ट, २०२५ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ● वर्ष २१ ● अंक २६३ ● पाने १२ (कोलाजसह) ● ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

भारताचा निर्धार संपूर्ण स्वदेशी!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतून ट्रम्प यांना दाखवला आरसा

वाराणसी (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतून आयातीसाठी २५ टक्के कर लावण्याची भाषा केली आहे. आता आम्ही त्या वस्तू खरेदी करू, ज्यामुळे भारतीयांचा घाम गाळला गेला आहे. जगाची अर्थव्यवस्था अस्थिर बनली आहे. पण आमचे शेतकरी, आमचे लघु उद्योग, आपल्या तरुणांचे रोजगार, त्यांचे हित आपल्याला अव्वल आहेत. आम्ही या सर्व वर्गाला केवळ स्वदेशी वस्तू विकण्याचे आवाहन केले आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. आपला मतदारसंघ असलेल्या वाराणसीमध्ये विराट जनसमुदायाला संबोधित करताना मोदी बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जेव्हा आपण आज आर्थिक प्रगतीबद्दल बोलत असतो तेव्हा मला जागतिक परिस्थितीकडे आपले लक्ष वेधून घ्यायचे आहे. आज जगाची अर्थव्यवस्था स्थिर नाही. अशा परिस्थितीत, जगातील देश आपापल्या हितावर लक्ष केंद्रित करीत आहेत. आता भारतही जगातील तिसर्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनणार आहे. म्हणूनच भारतानेसुद्धा आपल्या आर्थिक हितसंबंधांबद्दल जागरुक असले पाहिजे. आमचे शेतकरी, आमचे छोटे मूळ, आमच्या तरुणांचे रोजगार, त्यांचे हित आमच्यासाठी सर्वोपरी आहेत. सरकार या दिशेने सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. परंतु देशातील नागरिक म्हणून आमच्याकडेही काही जबाबदाऱ्या आहेत. (पान २ वर)

सैन्याच्या शौर्याचा काँग्रेसकडून सतत अपमान

ऑपरेशन सिंदूर पूर्णपणे यशस्वी झाले आहे, पहलगामचे गुन्हेगार देखील मारले गेले आहेत. दहशतवाद्यांना मारण्यासाठी तुम्हाला फोन करून विचारायचे का? त्यांना पळून जाण्याची संधी द्यायची का?, अशा थेट आणि बोचऱ्या शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यावर टीका केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी वाराणसी दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत २,१८३ कोटी रुपयांच्या ५२ विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले. या प्रकल्पांमध्ये रस्ते बांधकाम आणि रुंदीकरण, रुग्णालयांचे आधुनिकीकरण, शैक्षणिक संस्थांमध्ये सुधारणा, धार्मिक पर्यटनासाठी पक्क्या घाटांचे बांधकाम, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वीज आणि पार्किंग सुविधांचा विस्तार, तलावांचे नूतनीकरण, ग्रंथालये आणि प्राणी रुग्णालयांची स्थापना अशा कामांचा समावेश आहे. पीएम-किसान सन्मान निधी योजनेच्या २०व्या हप्त्याचे वितरणही पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाले आहे. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांना संबोधितही केले. मोदी यांनी अखिलेश यादव यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील आरोपींना ठार मारण्याच्या वेळेवरून अखिलेश यादव यांनी प्रश्न उपस्थित केल्याने पंतप्रधान मोदी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

ऑपरेशन सिंदूरनंतर मी प्रथमच वाराणसीला आलो आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला. त्यांच्या कुटुंबीयांना दुःख सहन करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना मी बाबा विश्वनाथ यांच्याकडे केली होती. त्यावेळी मी हल्ल्याचा बदला घेण्याचे वचन दिले होते. ते वचन मी पूर्ण केले आहे. ऑपरेशन सिंदूर हे काशी विश्वेश्वराला समर्पित असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले.

कोकण रेल्वे मार्गावरील सिंधुदुर्गच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्री नितेश राणे यांचे ठोस पाऊल

उद्या केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेणार

- सिंधुदुर्गमधील रेल्वे सुविधांबाबत सकारात्मक निर्णय होणार
- नवीन गाड्या सुरू करण्यासाठी आणि गणपती स्पेशल गाड्यांचे थांबे वाढविणार
- कोकण रेल्वे प्रवासी समितीच्या भेटीत मंत्री नितेश राणे यांची समस्यांवर सविस्तर चर्चा

कणकवली

कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांच्या विविध समस्यांसंदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी सोमवारी भेट घेणार असून, या बैठकीत तिकीट सुविधा, जलदगाड्यांचे थांबे, नवीन गाड्या सुरू करण्यासाठी आणि गणपती स्पेशल गाड्यांचे थांबे याची मागणी केली जाणार आहे. या संदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली. ओम गणेश निवासस्थानी कोकण रेल्वे प्रवासी समन्वय आणि संघर्ष समिती, सिंधुदुर्गच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री नितेश राणे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी राणे म्हणाले, "आपल्या सर्व मागण्यांवर रेल्वेमंत्र्यांसमवेत चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेणार आहे. यापुढे दर तीन महिन्यांनी मी आणि प्रवासी संघटना मिळून संयुक्त बैठक घेऊन समस्यांचे निराकरण करू." असे सांगितले.

यावेळी गणपती सणासाठी विशेष गाड्या

२५ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत मडूरे–दादर व सावंतवाडी–सीएसटीएम या दोन नव्या गाड्या तात्काळ सुरू कराव्यात. पुढे प्रवाशांचा प्रतिसाद पाहून (पान २ वर)

आयुष्याच्या ब्लॉगमधून युट्यूबरची अनपेक्षित एक्झिट

सासोली पाट्ये पुनर्वसन येथील शिरीष गवस यांचे निधन

दोडामार्ग (प्रतिनिधी)

तालुक्यातील सासोली पाटये पुनर्वसन येथील रहिवासी शिरीष सत्यवान गवस (३३) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. 'रेड सॉईल स्टोरी' या नावाने सोशल मिडीयावर ते प्रसिद्ध होते. त्यांच्या निधनाने सर्वांनाचा एकच धक्का बसला. त्याच्या सासोली पाटये येथे घरी सोशल मीडिया सेलिब्रेटी, राजकीय प्रतिनिधी, अधिकारी वर्ग यांनी अंत्यदर्शन घेतले.

गेल्या काही दिवसांपासून त्याच्यावर मेंदूशी निगडित आजारावर उपचार सुरू होते, अशी माहिती समोर (पान २ वर)

माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णाला जन्मठेप

न्यायालयाने ठोठावला १० लाखांचा दंड

बंगळूर (वृत्तसंस्था)

कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. अवघ्या १३ महिन्यांत या प्रकरणाचा निकाल देण्यात आला आहे. सोबतच न्यायालयाने त्याला १० लाखांचा दंडदेखील ठोठावला आहे. पीडितेला ७ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहे. ही शिक्षा आजपासून लागू झालेली आहे.

हासन जिल्ह्यातील होळेनरसीपूर येथील फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेवरील बलात्कारप्रकरणी प्रज्वल रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या वर्षभरापासून याप्रकरणी न्यायालयीन खटला सुरू होता, अखेर शनिवारी बंगळुरू येथील विशेष न्यायालयाने प्रज्ज्वल रेवण्णा यास दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. त्यामुळे, जनता दल सेक्युलर पक्षाला हा मोठा झटका मानला जातो. दरम्यान, लोकसभा निवडणुकांपूर्वीच प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपांमुळे राजकीय वर्तुळात रान उठले होते. त्यानंतर, देशभरात हे प्रकरण चर्चेत असल्याने आजच्या न्यायालयाच्या निर्णयाकडे देशाचे लक्ष लागले होते.

कर्नाटकातील जीडीएस नेते आणि माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना घरकाम करणाऱ्या महिलेवरील बलात्कार प्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आहे. एका फार्महाऊसमध्ये घरकाम करणाऱ्या महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी प्रज्वल रेवण्णा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. गेल्या वर्षी सेक्स स्कॅण्डलमध्ये समोर आल्यानंतर रेवण्णाचे नाव चर्चेत आले होते. (पान २ वर)

'बीएलओ'च्या मानधनात दुपटीने वाढ

निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांनाही मिळणार मानधन

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय निवडणूक आयोगाने केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (बीएलओ) मानधनात दुपटीने वाढ केली आहे. २०१५ पासून बीएलओंना ६ हजार रुपये मानधन मिळत होते. आता ते दुपटीने वाढवून १२ हजार रुपये करण्यात आले आहे. तर बीएलओ पर्यवेक्षकांचे मानधन १२ हजारांवरुन १८ हजार रुपयांपर्यंत वाढवले आहे. पहिल्यांदाच निवडणूक

नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांनाही मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या (पान २ वर)

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात पंतप्रधानांसह योगींना अडकवण्याचा कट

- 'हिंदू दहशतवादी' संकल्पना आणण्यासाठी खटाटोप
- कोणाचेही नाव न घेतल्याने प्रज्ञा ठाकूर यांचा तुरुंगात छळ
- आरएसएसच्या अन्य चार लोकांना गुंतविण्याचा प्रयास

मुंबई (प्रतिनिधी)

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातून निर्दोष मुक्त झाल्यानंतर भाजपच्या माजी खासदार प्रज्ञा ठाकूर यांनी तपास अधिकाऱ्यांवर मोठा आरोप केला आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आरएसएस प्रमुख मोहन भागवत आणि इतरांचे नाव घेण्यासाठी माझ्यावर दबाव

आणण्याचा प्रयत्न केला होता असे मत प्रज्ञा ठाकूर यांनी व्यक्त केले आहे. एनआयएच्या विशेष न्यायालयाने (पान २ वर)

गणेशोत्सवासाठी कोकण रेल्वेच्या विशेष गाड्या

सावंतवाडी (प्रतिनिधी)

गणेशोत्सवादरम्यान प्रवाशांची गर्दी लक्षात घेता कोकण रेल्वेने मुंबई आणि मडगावदरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्र. ०१००४/०१००३ मडगाव जं. - लोकमान्य टिळक (ट) - मडगाव जं. साप्ताहिक विशेष या नावाने ही सेवा सुरू होणार आहे.

गाडी क्र. ०१००४ मडगाव जंक्शनहून २४ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट आणि ७ सप्टेंबर २०२५ रोजी दर रविवारी दुपारी १६:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०६:०० वाजता (पान २ वर)

सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी यांचे अभीष्टचिंतन ...

सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी यांना वाढदिवसानिमित्त पालकमंत्री ना. नितेश राणे यांनी शुभेच्छा दिल्या. कणकवली येथील ना. नितेश राणे यांच्या ओम गणेश निवासस्थानी केक कापून मनीष दळवी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी महेश सारंग, समीर नलावडे, मिलिंद मेस्त्री, एकनाथ नाडकर्णी, सुधीर आडिवरेकर व प्रमोद गावडे होते उपस्थित होते.

२०३० नंतर माणसाचा मृत्यूच होणार नाही

माजी शास्त्रज्ञाची मोठी भविष्यवाणी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

येत्या काही वर्षांत मानवी मृत्यू ही भूतकाळातील गोष्ट होईल का? माजी गुगल अभियंता आणि प्रसिद्ध भविष्यवेत्ता रे कुर्झवेल यांनी असा दावा केला आहे. त्यांनी अलीकडेच म्हटलं आहे की २०३० सालापर्यंतच, म्हणजे आजपासून फक्त ५ वर्षांच्या आत, मानव अमर होऊ शकतो. ही साधी गोष्ट नाही, कारण कुर्झवेल यांनी आतापर्यंत १४७ भाकिते केली आहेत, त्यापैकी ८६ टक्क्यांपेक्षा जास्त भाकितं बरोबर असल्याचे सिद्ध झाले आहे.

रे कुर्झवेल यांच्या प्रसिद्ध पुस्तक 'द सिंग्युलॅरिटी इज निअर' मध्ये त्यांनी पहिल्यांदाच लिहिलं की येत्या काळात तंत्रज्ञान इतके विकसित होईल की मानव कधीही न मरणारी प्रजाती बनू शकेल. या पुस्तकात त्यांनी विशेषतः जेनेटिक्स, नॅनोटेक्नॉलॉजी आणि रोबोटिक्सचा उल्लेख केला आहे – ज्यांना ते अमरत्वाची गुरुकिल्ली मानतात.

टेक्नॉलॉजी कसे देईल अमरत्व?

कुर्झवेल यांच्या मते, तांत्रिक विकासाचा वेग इतका वेगवान झाला आहे की आपण लवकरच नॅनोबॉट्स, म्हणजेच सूक्ष्म रोबोट्स तयार करू शकू, जे मानवी शरीरात राहून काम करतील.

हे नॅनोबॉट्स :

शरीरातील खराब झालेल्या पेशी दुरुस्त करेल. वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावेल. रोगांशी लढेल, अगदी कर्करोगासारख्या गंभीर आजारांशीही लढतील.

हे छोटे रोबोट शरीरात तरंगतील आणि सतत त्याची दुरुस्ती करत राहतील. त्यामुळे अशा प्रकारे आपलं शरीर म्हातारं होणार नाही आणि माणूस कायमचा जगू शकेल.

एआय आणि कॉम्प्युटरचीही असेल मुख्य भूमिका

कुर्झवेल यांचा असा विश्वास आहे की २०२९ सालापर्यंत कॉम्प्युटर हे मानवांइतकेच बुद्धिमान होतील. असे स्मार्ट कॉम्प्युटर मानवी मेंदू चांगले समजू शकतील, तसेच कॉपी करू शकतील आणि विचारही करू शकतील. भविष्यात, मानव आणि एआयमधील ही दरी हळूहळू संपेल.

कोणती भाकितं ठरली खरी?

रे कुर्झवेल फक्त दावा करत नाहीत तर त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी, अनेक भाकितं आधीच खरी ठरली आहेत :

– १९९० साली ते म्हणाले होते की २००० पर्यंत कोणताही माणूस बुद्धिबळात संगणकाला हरवू शकणार नाही. हे १९९७ मध्ये खरे ठरले, तेव्हा आयबीएमच्या 'डीप ब्लू' संगणकाने जागतिक बुद्धिबळ विजेता गॅरी कास्पारोव्हचा पराभव केला. १९९९ मध्ये त्यांनी भाकीत केले होते की २०२३ पर्यंत फक्त १००० डॉलर्स किमतीचा लॅपटॉप मानवी मेंदूइतकी माहिती साठवू शकेल.

२०१० सालापर्यंत जगाच्या कानाकोपऱ्यात जलद वायरलेस इंटरनेट उपलब्ध होईल. हेही आजचं वास्तव आहे. जेव्हा ४जी हे भारतातील खेड्यांमध्ये पोहोचलंय आणि ५ जी सामान्य (पान २ वर)

ब्रिटिश काळापासूनची 'रजिस्टर्ड एडी' बंद; आता केवळ 'स्पीड पोस्ट'

पोस्टाचा मोठा निर्णय

मुंबई

टपाल खात्याच्या नव्या निर्णयानुसार, १ ऑगस्टपासून पारंपरिक 'नोंदणीकृत पत्र' सेवा (रजिस्टर्ड एडी) बंद करण्यात आली आहे. ब्रिटिश काळापासून सुरू असलेल्या शिस्तबद्ध आणि कायदेशीर मूल्य असलेल्या या सेवेचा शेवट झाला आहे. आता नोंदणीकृत पत्राची जागा स्पीड पोस्ट सेवेला दिली जाणार असून, त्यामध्येच ट्रॅकिंग, पोच पावती, कायदेशीर

दस्तऐवजांची पाठवणी या सुविधा असतील. परिणामी, 'नोंदणीकृत पोस्ट' आणि 'पोच पावती' यांसारख्या पारंपरिक संज्ञा आणि प्रक्रियाही आता इतिहासजमा झाल्या आहेत.

'नोंदणीकृत पत्र' म्हणजे एक कायदेशीर दस्तावेज होता. परीक्षा निकाल, न्यायालयीन नोटीस, सरकारी आदेश किंवा गावातील एखाद्याची महत्त्वाची सूचना हे सर्व नोंदणीकृत पत्राने पोहोचविले जात असे. हे सगळे आता इतिहासजमा झाले आहे. नवीन प्रणालीतून सेवांचा वेग, ट्रॅकिंगची सुविधा आणि डिजिटल युगाशी जुळवून घेण्याची तयारी दिसते. नव्या टपाल व्यवस्थेतील हा महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. मोबाइलमुळे पूर्वी तार (टेलिग्रॅम) सेवा अशीच बंद झाली होती. (पान २ वर)